
पारूल जव्हेरी / निमिष पटेल

# संरक्षण आणि संवर्धन परंपरागत शहाणपणाचं


भारतीय संदर्भांशी सुसंगत ठरणारं, इथल्या लोकांची मानसिकता, जीवनशैली, मूल्यं यांच्याशी जोडून घेणारं, परिसराशी मैत्री राखणारं डिझाइन- ही संकल्पना विकसित करणाऱ्या पारुल जव्हेरी आणि निमिष पटेल यांच्या कामाचं वेगळेपण त्यांच्याच शब्दांत.



घरबांधणी - संरचना या क्षेत्रात काम करताना आम्ही तीन गोष्टींवर सातत्याने भर देत आलो आहोत. एक म्हणजे आपल्या पूर्वजांनी जे काही केलं त्याचं, परंपरागत निर्णयप्रक्रियेचं महत्त्व आणि आजच्या काळाशी असलेला त्याचा संदर्भ जोडून दाखवणं. दुसरं म्हणजे भारतातल्या उच्च दर्जाच्या कारागिरांचं जतन करणं आणि तिसरं म्हणजे हा सगळा घरबांधणी रचनेचा खटाटोप करतान तो माणसांना सुखकारक ठरेल याकडे लक्ष देणं.

थोडक्यात कॉन्झर्व्हेशन म्हणजे संरक्षण - संवर्धनावर भर देऊन आम्ही काम करतो आहोत. 'प्रिझर्व्हेशन' आणि 'कॉन्झर्व्हेशन' यात फरक आहे. कॉन्झर्व्हेशन म्हणजे एखादी वस्तू पुन्हा जिवंत करणं. त्यात चैतन्य आणणं, त्याचा विकास करणं. प्रिझर्व्हेशनमध्ये ही जिवंत प्रक्रिया नसते. प्रिझर्व्हेशन म्हणजे एखाद्या गोष्टीचं आयुष्य वाढविणं. उदा. इमारत, एखादं शिल्प यांचं.

अमेरिकेतून वीस वर्षांपूर्वी आम्ही जेव्हा परत आलो तेव्हाच वेगळ्या दिशेनं काही करायचं, हा महत्त्वाचा निर्णय घेतला. आपलं काम हे भारतीय संदर्भांशी सुसंगत, उपयुक्त ठरेल आणि ते इथल्या





हवेलीचं जुनं आणि नवं रूप

लोकांची मानसिकता, जीवनशैली, मूल्यं यांच्याशी जोडून घेणारं, परिसराशी मैत्री राखणारं ठरेल, यावर भर देऊन 'डिझाइन' ही संकल्पना विकसित करायचं आम्ही ठरवलं.

कॉन्झर्व्हेशन या क्षेत्राकडे विशेष लक्ष द्यायचं ठरवल्यावर याविषयी नुसतं वाचण्याऐवजी थेट हिंडूनच आपली जाण वाढवायची असं नक्की केलं. उदयपूर फिरून त्या शहराची बलस्थानं हेरली. बलस्थानं आणखी बळकट कशी करता येतील ते बघणं आणि या शहराच्या कमकुवत बाजू कमी करणं म्हणजे कॉन्झर्व्हेशन, असं ठरवून आम्ही कामाला लागलो.

एकदा हा निर्णय घेतल्यावर आमच्या आयुष्याची दिशाच बदलून गेली. इतिहास कधी नव्हे इतका चांगला कळला. इतिहास म्हणजे फक्त सनावळ्या नव्हे तर त्याचा आजच्या जगण्याशी संदर्भ जोडणं हे भान आलं. आपल्या पारंपरिक निर्णय प्रक्रियेचा अभ्यास केल्यावर लक्षात आलं, की आज बरेच आर्किटेक्ट कशाच्या आधारावर निर्णय घेतात, तर निव्वळ पाश्चात्यांचं अनुकरण करून. भारतीयच नव्हे तर पूर्वेकडील कोणत्याच विचारधारेचा प्रभाव त्यांच्यावर नाही. आहे ते फक्त पाश्चिमात्त्य अंधानुकरण. पूर्वेकडची परंपरा ही समग्र विचाराची आहे, तर पाश्चिमात्य हे फक्त तुकड्या

तुकड्यात विचार करतात. प्रत्यक्षात सुटं सुटं असं काही नसतं. तुम्ही कोणतीही कृती करा - त्याचे बरेवाईट परिणाम या विश्वावर होतात, असं आता शास्त्रज्ञही मान्य करू लागलेत. थोडक्यात 'होलिस्टिक दृष्टिकोन' ही आपली परंपरागत देणगी आहे.

पाश्चिमात्यांचं अनुकरण न करणं आणि पारंपरिक शहाणपणाचा शोध घेणं, या निर्णयप्रक्रियेचा एक भाग म्हणून आम्ही बांधकामासाठी स्थानिक साहित्य (लोकल मटेरियल) वापरायला सुरवात केली. त्या त्या परिसरात मिळणाऱ्या बांधकाम साहित्याची ऊन, पाऊस, वारा यांना तोंड देण्याची सिझनल सायकल तशीच राहणार! त्यामुळं ते जास्त टिकणार. राजस्थानात इमारतीसाठी लाईम स्टोन वापरतात. प्लॅस्टरिंगसाठीही चुन्याचा वापर होतो आणि इमारतींना बाहेरून चुना सफेदी करतात.


राजस्थानचे आमचे कारागीर म्हणतात, की सिमेंट ९० व्या वर्षी संपून जातं, तर चुन्याचं आयुष्य ७० व्या वर्षी सुरू होतं. कारण तेव्ह त्याचा दगड बनतो. राजस्थानात पारंपरिक पद्धतीनं जे वॉटरप्रूफिंग करतात त्यातही चुना आणि आणखी काही घटकांचं मिश्रण असतं. प्लॅस्टरिंग करतानाही चुन्यावर बरीच प्रक्रिया करून तो 'तयार' करतात. गंमत म्हणजे प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे घटक वापरतात. हे प्लॅस्टर असं होतं, की मुंगीलाही त्यावर चढता येऊ नये इतकं गुळगुळीत आणि सरळ. नावालाही खडबडीतपणा नाही.


## आधी मजबुती


पूर्वीच्या आणि आताच्या कार्यपद्धतीमधला एक महत्त्वाचा फरक आम्हाला जाणवला. पूर्वी बांधकाम साहित्याचा, बांधकाम पद्धतीच, त्यातल्या तंत्रज्ञानाचा विचार पहिल्यांदा करत आणि मग ते सुंदर कसं दिसेल याचा विचार होई. आता आपण बरोबर उलटीकडून सुरवात करतो. सुंदर कसं दिसेल, या टोकाकडून सुरवात करून मग त्यासाठी साहित्य शोधतो आणि इथेच सगळं गाडं फसतं. आता जे सगळे प्रयोग चालतात ते सौंदर्य, कलात्मकता यामध्ये चालतात. बांधकाम साहित्यावर नाही.


आम्ही मात्र काम करताना बांधकामाचं किंवा अन्य सजावटीचं साहित्य, त्याची क्षमता, त्याचा टिकाऊपणा आधी लक्षात घेतो. बांधकाम पहिलं निर्दोष होईल असं बघतो. त्यामुळेच ते अधिक टिकाऊ ठरतं. आमची पद्धत अशी आहे, की आम्ही स्थानिक कारागिरांबरोबर बसतो - बोलतो. त्यांना सांगतो. तुमची भूमिका शिक्षकाची आहे. आपण बरोबर काम करू. या पद्धतीतून आमच्या असं लक्षात आलंय, की त्यांच्याइतकी बांधकाम साहित्याची उत्तम जाण अन्य कोणालाही नाही. या कारागिरांपर्यंत हा वारसा आलाय परंपरेतून, कोणत्याही पुस्तकातून नव्हे. कारण त्यांनी डॉक्युमेंटेशन असं काही केलेलंच नाही. हातातल्या छिन्नी-हातोड्याच्या साह्याने ते बरंच काही सांगू शकतात. हातोडा दगडावर मारल्यावर कसा आवाज येतोय त्यावरून त्या दगडाचा दर्जा कसा आहे, त्याला आतून चीर गेलीय का, याचा ते बरोबर अंदाज

*मूळ आराखडा तोच ठेवून*
*( उजवी कडील फोटो)*
*बदललेलं रूप(डावीकडच्या फोटोत)*









*उदयपूरच्याच कारागिरांच्या मदतीनं जुन्या पडक्या हवेलीचं पुनरुज्जीवन.*

बांधतात.

वर्षानुवर्षं टिकणारं वॉटरप्रूफिंग ते कसं करतात, काय मटेरियल वापरतात, असे प्रश्न आम्ही त्यांना सुरवातीला विचारायचो. तेव्हा दरवेळी हे कारागीर वेगळी उत्तरं द्यायचे. हे असं का करतायत, याचा शोध घेण्याचा आम्ही प्रयत्न केला, तेव्हा लक्षात आलं, की त्यांना कुठेतरी भीती वाटते, की त्यांच्याकडून मिळालेलं हे ज्ञान आम्ही बाहेर विकून त्याचा पैसा करू. मग आपली पुढे गरजच राहणार नाही. या असुरक्षिततेपोटी ते खरं सांगत नव्हते. आम्ही त्यांना म्हटलं, 'तुम्ही काय करता, ते आम्हाला मुळीच सांगू नका. आम्ही फक्त तुमच्याबरोबर काम करू.' अशी चार वर्षं गेल्यानंतर तेच म्हणायला लागले, की आम्ही काय करतो ते जाणून घ्यायची तुम्हाला उत्सुकता नाही का? तेव्हा आम्ही म्हटलं, 'तुम्हाला घेऊनच आम्ही काम करतोय. त्यामुळे तुमच्या ज्ञानाचा होतोय तेवढा फायदा आम्हाला पुरे आहे.'

## हवेलीचं पुनरुज्जीवन

उदयपूरला आम्ही एका हवेलीचं हॉटेलमध्ये रूपांतर केलं. सुरवातीला हॉटेलविषयी लोकांच्या कल्पना वेगळ्या होत्या; पण मूळ हवेलीचं रूप कायम ठेवून पर्यटकांची त्यात सोय झाली, तर ते अधिक आकर्षक ठरेल हे लोकांना नंतर कळलं. उदयपूरमध्ये पहिल्या हवेलीचं हॉटेल झाल्यानंतर दुसरं व्हायला मध्ये १५ वर्षांचा काळ गेला; पण त्यानंतर म्हणजे दुसऱ्या हॉटेलनंतर अवघ्या दहा वर्षांत अठ्ठाविसावं हॉटेल उभं राहिलंय. यात दोन फायदे होतात. एक तर पर्यटकांना ते वातावरण खूप आवडतं आणि दुसरं म्हणजे उदयपूरच्याच कारागिरांना काम मिळतं. हॉटेल सजावटीसाठी स्थानिक वस्तूच वापरल्या जातात. पंचतारांकित हॉटेलसारखं बाहेरून काही मागवावं लागत नाही. म्हणजे पैसा बाहेर न जाता तिथेच खेळता राहतो. अशा हवेल्यांचं पुनरुज्जीवन करताना आम्ही जे कारागिर घेतले होते त्यापैकी काही आता पूर्णपणे स्वतःच्या हिमतीवर



## पारूल जव्हेरी , निमिष पटेल

*निमिष पटेल आणि पारूल जव्हेरी या आर्किटेक्ट दांप्त्यानं अहमदाबादमध्ये अभिक्रम नावाची संस्था १९७९ मध्ये सुरू केली. परिसराशी मैत्रीपूर्ण ठरणारी अंतर्गत संरचना, परंपरागत कौशल्यांचं संवर्धन (कॉन्झर्व्हेशन) आणि भारतीय संदर्भात सुसंगत ठरणारं काम हे अभिक्रमचं वैशिष्ट्य!*

*अहमदाबाद आणि केंब्रिज, एमआयटी या ठिकाणांहून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी अहमदाबादला परत येण्याचा निर्णय घेतला आणि काम सुरू केलं. रचना, अंतर्गत संरचना याबरोबरीनं गुजरात - राजस्थानमधल्या कुशल कारागिरीचं मोल जाणणं, त्यांची पुनर्स्थापना करणं हे महत्त्वाचं काम त्यांनी केलं आहे.*

*आजवर या दोघांना अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय सन्मान आणि पारितोषिकं मिळाली आहेत. अलीकडेच अहमदाबादला त्यांनी केलेल्या टोरंट रीसर्च सेंटर या इमारतीसाठी त्यांना २००० मध्ये 'जीआयआयइ 'पुरस्कार आणि उदयपूरमधील हवेलीच्या पुनरुज्जीवनासाठी युनेस्को - एशिया पॅसिफिक हेरिटेज कॉन्झर्व्हेशन पुरस्कार मिळाला.*

*निमिष पटेल यांनी अहमदाबादमध्ये बी. व्ही. दोशी यांच्याबरोबर काम करून करियरला सुरवात केली. एमआयटी - केंब्रिजची एक टीम बैरूट, लेबनान येथे २५० घरांचे संकुल उभे करण्यासाठी पाठवली होती. त्यामध्ये निमिष पटेल यांचा समावेश होता. ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, स्वित्झर्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, आखाती देश, द. आफ्रिका, मेक्सिको, इंग्लंड, अमेरिका असा भरपूर प्रवास करून त्या त्या ठिकाणी त्यांनी व्याख्यानं दिली आहेत. परदेशातील वास्तुरचनाकारांच्या नियतकालिकांमध्ये त्यांचं लेखन प्रसिद्ध झालं आहे.*